५७

ADAT VYAPARI MANDAL SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



# CONTENTS OF MARATHI PART - IV



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | समीक्षा, संकल्पना आणि स्वरुप<br>**प्रा. डॉ. अपर्णा अ. पाटील** | १४६-१४९ |
| २८ | स्त्रीवाद आणि स्त्रीवादी समीक्षेची मूलतत्त्वे<br>**गणेश रं. राठोड** | १५०-१५३ |
| २९ | मराठी ग्रामीण साहित्य समीक्षेची सद्य:स्थिती (संदर्भ-कथा व कादंबरी)<br>**प्रा. डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले** | १५४-१५८ |



**Dr. Anil Chidrawar**
**I/C Principal**
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

VOL [?] ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJ[?] [IS]SN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २९. मराठी ग्रामीण साहित्य समीक्षेची सद्यःस्थिती
## (संदर्भ-कथा व कादंबरी)

**प्रा. डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले**
सदस्य, मराठी अभ्यास मंडळ आणि सदस्य, परिक्षा व मूल्यमापन मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, देगलूर महाविद्यालय, देगलूर, जि. नांदेड.

मराठी साहित्य समीक्षा बहुविध पद्धतीने अवतीर्ण होत आहे. संस्कृत टीका आणि पाश्चात्य समीक्षेच्या धर्तीवर आधुनिक समीक्षाविचार प्रकट झाला. परंतु साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहाने मराठी साहित्यातील साचलेपणा दूर करून नवमूल्यांची प्रस्थापना केली त्यातून समकालीन मराठी साहित्य समीक्षालेखन करण्यात येत आहे. मराठी भाषा आणि मराठी साहित्य असे दोन स्वतंत्र विभाग मानून त्यांचे स्वतंत्रपणे समीक्षा लेखन झाले पाहिजे. भाषा ही मानवाची अर्जित संपत्ती आहे. भाषा ही सामाजिक संस्था आहे, याप्रमाणे मानवाच्या प्रगती किंवा परागतीचे द्योतक म्हणून त्यांच्या भाषेकडे पाहवे लागते. सामाजिक संस्था म्हणून भाषेचे प्रचलन वर्षानुवर्ष घडते. म्हणून कोणतीही व्यक्ती असो वा समाज आपल्या भूत, भविष्य आणि वर्तमान या तिन्हींशी संबंध्द असतो. प्रवाहित होत असतो.

"समीक्षा म्हणजे समांतर घटनांचा संशोधनात्मक, तौलनिक, मूल्यमापनात्मक व मूल्यात्मक केलेले टीकात्मक विश्लेषण" या संकल्पनेमधून साहित्याचे आलोचनात्मक अवलोकन करण्यात येते. सम+ईक्षा या दोन पदांपासून समीक्षा हा शब्द तयार झालेला असून संस्कृत परंपरेप्रमाणे मराठी साहित्य समीक्षा ही संकल्पना आरंभ काळात पुढे आलेली असली तरी नंतरच्या काळात पाश्चात्य मीमांसकांच्या संकल्पनात्मक विवेचनामधून आधुनिक साहित्य समीक्षा संकल्पना, स्वरूप, विशेष व वाटचाल घडलेली आहे. वाङ्मयीन टीका हा शब्द संस्कृत वळणाने प्रचलित आहे. परंतु Critic व Criticism या इंग्रजी साहित्यातील संकल्पनेतून मराठी साहित्य समीक्षेची मूलतत्त्वे व साहित्यविचार तथा समीक्षाविचार विकसित झालेला आहे. कालखंडानुरूप मराठी साहित्य प्रवाहासोबतच समीक्षा लेखनाच्या कक्षा विस्तृत झालेल्या असून ग्रामीण साहित्य समीक्षा लेखन ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या साहित्य चिकित्सेतूनच जन्माले आले. ग्रामीण जीवन आणि संस्कृती यांच्या प्रभावामधून साहित्याची निर्मिती कशी झाली, याची उकल करताना ज्यामुळे माणसांच्या जीवनशैलीत स्थित्यंतरे झाली, नवे वळण लागले, तेवढयाच घटनांना प्रस्तूत समीक्षेच्या संदर्भात घेणे महत्त्व आहे. कारण समीक्षा म्हणजे स्थित्यंतरवेध. जेथे स्थित्यंतर नाही, केवळ स्थितीच आहे. तेथे समीक्षा उद्‌भवत नाही. प्रस्तुत लेखामध्ये ग्रामीण साहित्य समीक्षेची सद्यस्थिती या अनुषंगाने मागोवा घेण्यात येत आहे.

**उद्दिष्ट**

१. ग्रामीण साहित्य समीक्षेचे पैलू शोधणे, २.साठोत्तरी प्रवाहातील वेगळेपण नमूद करणे, ३.साहित्य समीक्षेतील ग्रामीण साहित्य समीक्षेची स्थिती कथन करणे, ४.ग्रामीण साहित्याच्या लेखनामध्ये कादंबरी व कथा वाङ्मयाच्या समीक्षेचा मागोवा घोणे,

५.ग्रामीण कथा- कादंबरी लेखनाची साठोत्तरी वाङमयीन प्रवाहाशी तुलना करणे, ६.एकूण प्रवाह आणि इतिहास यामध्ये साहित्यकृती व लेखक यांचे स्थान निश्चिती करणे

## गृहिते

१. एखाद्या प्रवाहातील साहित्यकृतीचे अवलोकन कसे झालेले आहे, आलोचनाकारांनी कोणती वाङ्मयीन मूल्ये शोधली आहेत, ग्रामीण साहित्याची मीमांसा लेखनकार्य करताना साहित्यकृती आणि लेखक यांचे स्थान निश्चित करण्याचे अवघड काम त्यांच्या हातून घडले आहे. २.ग्राम, ग्रामीण, ग्रामीण साहित्य व मराठी ग्रामीण साहित्य या संकल्पनांचा व भाषेचा धांडोळा हा समीक्षा अभ्यासाचा पाया आहे. ३.मराठी ग्रामीण साहित्य प्रकारात कथा व कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे वेगळेपण आहे. ४.साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहामध्ये ग्राम, ग्रामीण व ग्रामीण साहित्य, ग्रामीण कादंबरी आणि ग्रामीण कथा या संकल्पना निराळेपण जपून आहेत.

आधुनिक मराठी वाङ्मयातील समीक्षा लेखनाची वाटचाल अवलोकन केली असता ग्रामीण साहित्याची साहित्याची समीक्षा अतिशय गडदपणे वेगळिक दर्शविते. कारण ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या सुरूवातीच्या काळात वासदेव मुलाटे १.ग्रामीण साहित्य : चळवळ आणि आम्ही, २.ग्रामीण साहित्य: चिंतन आणि चर्चा, ३. .ग्रामीण साहित्य स्वरूप आणि दिशा आनंद यादव १. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या(१९७९-पुणे), २.ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव (१९८१-पुणे), ३. मराठी साहित्य : समाज अणि संस्कृती (१९८५-पुणे), ४. ग्रामीण साहित्य विशेषांक, मसाप-पुणे, रा.रं. बोराडे - ग्रामीण साहित्य, नागनाथ कोत्तापल्ले - .ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध(१९८५), द.ता भोसले - ग्रामीण साहित्य : एक चिंतन ( १९८८-पुणे), गणेश देशमुख - ग्रामीण समाजजीवन आणि साहित्य(२००८), रामचंद्र काळुंखे -ग्रामीण कादंबरी आकलन अणि विश्लेषण(२०१३), विठ्ठल जंबाले -ग्रामीण साहित्य स्वरूप, ग्रामीण कादंबरी : मराठवाडी बोलीचे स्वरूप(२०१२), यांचे समीक्षा लेखनाचे प्रयत्न झाले. त्यातूनच "मराठी ग्रामीण कादंबरी " (रवींद्र ठाकूर - १९९९ पहिली आवृत्ती प्रकाशित), "ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन " (श्रीराम गुंदेकर) यांच्यासारखे लोकप्रिय व पुनः पुन्हा आवृत्ती सिद्ध करून समीक्षा लेखनात भर घालणारे अनेक मीमांसक आहेत. काळानुरूप काही समीक्षा लेखकांनी केलेले प्रयत्न समीक्षा लेखनाचे विविध दृष्टिकोन, प्रवाह, प्रवृत्ती यांची प्रतीती देणारे आहेत. यामधून साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांच्या अनुषंगाने तथा वाङ्मय प्रकारानुरूप चिकित्सक व विवेचक लेखन अभ्यासक, लेखक व समीक्षकांच्या निरनिराळया साहित्यानुभूतीतून समोर आलेले आहेत.

साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहातील ग्रामीण साहित्य प्रवाहातील कथा आणि कादंबरी याप्रकारांचे इतिहास लेखनामध्ये नवे आयाम प्राप्त व्हावे, यासंकल्पनेमधून तळागाळातील माणसांच्या जगण्याला अधोरेखित करण्याच्या प्रयत्नामधून या साहित्य प्रवाहाचे उद्गम, विकास आणि उत्कर्ष झालेले आहेत. साहित्यापासून दुर्लक्षित आशय आणि त्यांच्याच नैसर्गिक अभिव्यक्तीमधून या साहित्यप्रवाहांची जोरकस वाटचाल घडलेली आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात खेडयातील नवशिक्षित मंडळीकडून विविध साहित्य प्रकारांमधून साहित्य निर्मितीचे प्रयत्न झाले. त्यामध्ये कथा- कादंबरी लेखनामध्ये मोलाची भर पडली आहे. त्यांचे मध्यवर्ती सूत्र ग्रामीण लेखकांनी योजले. खेडे, खेडयातील संस्कृती, निसर्ग , निसर्ग व मानव यांतील नातेसंबंध, कृषिसंकृस्तीशी असलेली घट्ट नाळ, आधुनिकतेशी खेडयाचे वाढते नाते, त्यामुळे ग्रामीण जीवनातील संक्रमण,



Deglour College ... Dist.Nanded

कमालीचे परिवर्तने, बदलते खेडे या मूलभूत बाबींचे पडसाद कथा-कादंबरीमध्ये उमटले. या साहित्यलेखनामध्ये असर्शित राहिलेल्या बाबीमधून रसरशीत ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले. मात्र ग्रामीण साहित्याची समीक्षा आणि समीक्षा लेखन व्हावे तसे घडले नाही. सर्वंकष आणि गुणात्मक आलोचनाही झाली नाही. म्हणून मराठी ग्रामीण समीक्षा लेखनामधून "समग्रलक्ष्यी" विवेचन झाले पाहिजे. ग्रामीण साहित्यकृतीच्या पूर्वखुणांचा शोध घेऊन सर्वांगीण साक्ष घडविण्याचा प्रयत्न होणे अधिक महत्त्वाचे असते.

"ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास" (१९९६) या प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या संपादित ग्रंथामधून ग्रामीण वाङ्मयाचा ऐतिहासिक मागोवा घेण्यात आलेला आहे. या लेखनातून कथा, कादंबरी, ललितलेखन, कविता, नाटय, आत्मचरित्र, शब्दचित्रात्मक साहित्य, समीक्षा, ग्रामीणत्व, मराठी साहित्यातील स्थान, शेतकरी साहित्य इत्यादी ग्रामीण साहित्यप्रकारांचा ग्रामीण साहित्याच्या चिंतनशील लेखक-अभ्यासक- मीमांसकांनी वेध घेतलेला आहे. परंतु त्याचे पुनर्रावलोकन तथा पुनर्मूल्यांकन ग्रामीण साहित्य अभ्यासकांनी अलिकडील काळात आपापल्या कुवतीप्रमाणे केलेले क्वचितच आढळते. "मराठी ग्रामीण कादंबरी" (२००१) डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या ग्रामीण कादंबरी वाङ्मयेतिहासलेखनातून ग्रामीण कादंबरीचा परिशीलन करण्याचा प्रयत्न केला. तसेच "मराठवाडयातील साहित्य" , "ग्रामीण कादंबरी -मराठवाडी बोलीचे स्वरूप" यापुस्तकामधून कथा आणि कादंबरी यांच्या समीक्षा लेखनातून ऐतिहासिक पर्यालोचन करण्यात आले.

सामान्य माणसाचे जगणे त्यांच्याच दैनंदिन भाषेतून मुखर करणे, स्वानुभवांना साहित्यरूप देणे, अभिजन संस्कृतीला बहुजन संस्कृती हा साहित्यसर्जनासाठी जोरकसपणे उगम पावून त्यास प्रवाहरूप प्राप्त होणे, यामूलप्रेरणांनी मराठी साहित्याचा प्रकारांमधून आणि लेखनकृतीमधून साकार झाले. परिणामता स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी वाङ्मयीन वाटचाल पूर्वासुरींच्या वाटा बदलून नवी वळणे घेऊन कथा-कादंबरी आणि इतर वाङ्मय प्रकारांच्या निर्मितीमधून अवतीर्ण झाली. कथा- कादंबरीमधून कृषिजन संस्कतीची चित्रणे होऊ लागली. ग्रामीण कथा आणि ग्रामीण कादंबरीमधून घडलेल्या विचारप्रवाहाचा तथा यासंबंधीच्या जाणिवांचा शोध घेणे अभ्यासक या नात्याने, ग्रामीण साहित्याभ्यासक यानात्याने समीक्षा लेखनाला नवे आयाम मिळवून देऊ शकते.

एखाद्या लेखकाला अथवा लेखनकृतीला बहुविध संदर्भ लाभण्याची भक्कमता, सक्षमता असते. त्या साहित्यकृतीमध्ये सापडणाऱ्या काही मूल्यांच्या आधारे साहित्यकृतीचे एकसुरीपण दर्शविणारे विवेचन समीक्षेतील मांडणीला बाधा पोहचू शकते. म्हणून मीमांसकाने बहुविध आयाम , व्यापक तत्त्वे, वैचारिक प्रगल्भता ठेवून मांडणी करणे, अभ्यासकांच्या परिपक्वतेची भिन्न प्रवाह, प्रेरणा आणि प्रवृत्ती यांचे दर्शन घडविणे क्रमप्राप्त ठरते. एकंदरित महाराष्ट्रीय साठोत्तरी जीवनमान महामानवांच्या उक्ती आणि कृतीने प्रभावित झालेले असून त्याच विचारप्रवाह, प्रेरणा व प्रवृत्ती साहित्याचा अविभाज्य घटक बनलेले आहेत. महामानवांच्या ठळक व पुसटशा पाऊलखुणांचा मागोवा घेणे समीक्षकांना आवश्यक आहे. करिता समीक्षणाची जाण व त्याला वास्तवाचे भान विषयवैविध्य व्यासंग, आकलन समीक्षा लेखनाची कक्षा विस्तृत करणारे ठरतील.

महात्मा जोतिराव फुले हे आधुनिक मराठी साहित्याचे जनक आहेत. त्यांच्या प्रेरणेमधून आधुनिक म्हणजेच आंग्ल काल व आंग्ल कालोत्तर मराठी साहित्याची भरभराट झाली, त्यांचे निर्माते आणि मूलप्रेरणास्थान म. फुले आहेत. पर्यायाने साठोत्तरी

वाङमयीन, सामाजिक व इतर चळवळीचे आणि साहित्य प्रवाहांचे उद्गाते म्हणून त्यांचे कार्य अतुलनीय आहे. त्यांचा प्रभाव ग्रामीण साहित्यावर आहेच. या प्रभावाचे ठळक संदर्भ कथा आणि कादंबरीमधून आलेले आहेत. जोतिरावांच्या लेखणीचा आणि वाणीचा दीर्घकालीन प्रभाव जनमाणसांवर आणि मराठी सारस्वतावर टिकून आहे. त्यांच्या सत्यशोधकी विचारधारेतून मराठी साहित्याचे संचित वृद्धिंगत करण्यामध्ये मोलाचे योगदान राहिले . यासंबंधित आजपर्यंतच्या ग्रामीण वाङमय ईतिहासकारांनी व समीक्षकांनी घ्यावा तेवढा सकारात्मक आढावा घेतला नाही. सत्य इतिहास ग्रंथबद्ध झाला नाही. म्हणून सत्यशोधकी साहित्याच्या अभ्यासकांनी म. फुले प्रणित इतिहासाची नव्याने मांडणी करण्याचे प्रयत्न केले. डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या कष्टातून "सत्यशोधकी साहित्याचा इतिहास" वाचकांसमोर आलेला आहे.

महामानवांच्या प्रेरणा व सत्त्व घेवून मराठी साहित्यामध्ये विविध वाङ्मयीन प्रवाह उदय, विकास आणि उत्कर्ष झालेले दिसतात. त्यांच्या मुळाशी महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या अंतःप्रेरणा दडलेल्या होत्या. त्यामुळे लेखनप्रवाहात दाखल झालेला नवशिक्षित वर्ग या महापुरूषांचे उत्तरदात्वि चालवित आहोत,असे जाहीरपणे व्यक्त केले. कथा - कादंबरी लेखनातून महापुरूषांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करू लागले. त्यांच्या लेखनामधून सुत्रबध्दतेने मांडले. परिणामता महामानवांच्या विचार आणि कार्याच्या कथनातून लेखकांने मांडणी केलेली आहे. त्या संकल्पना मध्यवर्ती ठेवून लेखकानी कथा -कादंबरी कसे लेखन केले, याचा मागोवा अभ्यासकांनी घेतला पाहिजे.

ग्रामीण कथा-कादंबरी या वाङ्मयप्रकारांची संकल्पना , स्वरूप , विशेष , प्रकार व घटक यांचा मागोवा मार्मिकपणे घेता आला पाहिजे. ग्रामीण कथा-कादंबरी साहित्य समीक्षा लेखनासाठीचे प्रयत्न अतिशय तोकडे आहेत. साहित्येतिहास लेखनासाठीचे दृष्टिकोन, तंत्र आणि गतकालापसून आजपर्यंत निर्माण झालेल्या ग्रामीण कथा-कादंबरी साहित्येतिहासलेखनातील समीक्षा आणि संशोधनात्मक समीक्षा लेखन अलिकडील काळात त्रोटक आढळते. याकरिता विद्यापीठीय अभ्यासक्रमात देशीभाषांचा शिरकाव असला पाहिजे. समीक्षक हे अध्यापक-लेखक-अभ्यासक केवळ विद्यापीठीय अभ्यासक्रमाशी संबंधित आहेत. त्यांनी मराठी वाङ्मयाला चिटकून राहावे, ही भूमिका ठेवल्यास ग्रामीण कथा-कादंबरी साहित्य समीक्षा लेखन समृद्धतेनजिक पाहचेल, याबाबत साशंकता नाही.

**निरीक्षणे : उपरोक्त विवेचनावरून काही निरीक्षणे नोंदविण्यात येत आहेत. ती पुढीलप्रमाणे-**

१. मराठी भाषा आणि मराठी साहित्य यांचा स्वतंत्र अभ्यासविषय म्हणून दखल घेणे कालसुसंगत ठरेल. समीक्षा लेखन करताना याबाबी मध्यवर्ती ठेवून साहित्यकृतींचे अवलोकन करण्यात यावे.

२. समीक्षकांनी भाषावैविध्य तपासणे, भाषाशास्त्रीय व बोलीवैज्ञानिक चिकित्सा करणे, लेखनकृतीतील पात्ररूप संवादामधील ढब, लकब, शैलीचा शोध घेताना वास्तव बोलरूपांशी तौलनिक मीमांसा करणे , शब्दप्रवृत्ती, शब्दसंग्रह, म्हणी, उखाणे, वाक्प्रचार, शब्दबंध तथा सुभाषिते यांचा उलगडा करणे, परभाषीय प्रभावांची मीमांसा करणे, क्रिऑल भाषेचा व पिजिन भाषेचा शोध घेऊन भाषिक नोंदी करणे.

३. मुद्रित साहित्याबरोबर लिखित साहित्याची नोंद घेणे आगत्याचे आहे. तसेच दूरस्थ लिखित साहित्यकृतीची दखल घेतली पाहिजे. अशा दर्जेदार साहित्यकृतींना प्रकाशनसंस्थांच्या वाटेवर पोहचविणे आणि त्याची समीक्षाकांनी नोंद घेणे मोलाचे ठरेल, असे वाटते.



ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

४. समीक्षकांचे दूषित दृष्टिकोन बदलायला हवेत. समीक्षा लेखन ही विशिष्ट अभ्यासकांची मक्तेदारी राहिलेली असून त्यामुळे अनेक चुकीच्या बाबी आलेल्या आहेत आणि सत्य घटक आलेले नाहीत. प्रचलित ईतिहासात बहुजन लेखकांचे योगदान त्रोटकपणे आलेले आलेले आहे. काही लेखकांच्या कार्याची दखलसुद्धा घेतलेली नाही. परंतु साहित्यकृतींच्या सर्वसमावेशक समीक्षा लेखन होणे महत्त्वाचे आहे.

५. ग्रामीण लेखकांच्या लेखनकृतीमधून जाणवणाऱ्या महामानवांच्या प्रभावांची उकल करणे वाङमयेतिहासाच्या मांडणीला अधिकाधिक परिपूर्ण करणारे ठरेल. महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या ग्रामीण साहित्याला प्रेरित करणाऱ्या महामानवांच्या कार्याचे अथवा साहित्यांचे परिणाम समीक्षकांनी शोधावेत.

६. ग्रामीणत्वाचा प्रतिबिंब उलगडताना ग्रामीण जगणे, कृषिजनसंस्कृती, निसर्ग व मानव यांचे ऋणानुबंध, ग्रामीण भाषा आणि परंपरांचा शोध घेणे, त्याची ग्रामीण समीक्षा लेखनात नोंद घेण्यात यावी.

७. लेखक, घटना, साहित्यकृती , कालनिर्देश , वाङ्मयीन मूल्ये आणि लेखन अभिव्यक्ती यांच्या अचूक व यथोचित नोंदी कराव्यात.

जागतिक स्तरावर श्रेष्ठ दर्जाच्या कथा-कादंबरी लेखनाचे अथवा मूल्यांकनासाठीचे निकष ठरलेले आहेत, परंतु मराठीत मात्र होत असलेल्या समीक्षेत अशा पध्दतीचे निकष आपण ठरवू शकलेलो नाहीत हे वास्तव आहेच. लिखित वा मुद्रित साहित्याचा मागोवा घेत असताना केवळ ग्रंथबध्द साहित्य आधारभूत मानून समीक्षा लेखन करण्यात येते. तसेच लिखित साहित्यामध्येही गाजलेल्या, आवडत्या, जवळच्या ओळखीच्या लेखकांच्या साहित्यकृतीच्या अनुषंगाने भरपूर विवेचन करण्याकडे इतिहास लेखकांचा कल दिसतो. त्यामुळे वास्तव झाकोळण्याची दाट शक्यता असते. पुरस्कार प्राप्त साहित्यकृतीबद्दल ऐतिहासिक अवलोकनामध्ये आस्वादात्मक व अतिरिक्त विवेचन केलेले आढळते. तसेच पुरस्कारापासून कोसोदूर, वाचकांपासून प्रकाशनापासून न पोहचलेल्या साहित्यघटकांपर्यंत वाङ्मयीन समीक्षा पोहचणे उपयुक्त ठरेल. समीक्षकांच्या अभिप्रायापासून अथवा समीक्षणापासून अलिप्त राहिलेल्या साहित्यकृतीचे अवलोकन झाले पाहिजे. परंतु वाङ्मयीन गुणांनी सरस असलेल्या साहित्यकृतीबद्दल त्रोटक माहिती नोंद असणे, हे समीक्षेच्या लेखनामधील असमतोल दर्शविते. त्यामुळे वाङ्मयीन हानी घडते. करिता समीक्षकाने त्याच्यावरील संस्कार, जगण्याची-अध्ययनाची चाकोरी आणि इतिहासलेखन परंपरांचे जोखड झुगारून दिले पाहिजे, दुर्लक्षित साहित्यकृतीच्या नोंदी घेऊन ग्रामीण साहित्य समीक्षालेखन अधिकाधिक समृद्ध आणि संपन्न बनविले, तरच त्यांचे वाङ्मयीन कार्य ऐतिहासिकदृष्टया चिरंतन ठरेल.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded